संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. ०३.१०.२०२५ | अंक नं. १५४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020
























जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# वाहनचालकाकडून २ लाख ६० हजारांच्या बॅटऱ्यांची परस्पर विल्हेवाट

### केडगाव बायपास चौक परिसरातील घटना, चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - एका ट्रान्सपोर्ट कंपनीच्या वाहनचालकाने पुणे येथे पोहोच करण्यासाठी त्याच्या ताब्यात दिलेल्या एक्साईड कंपनीच्या १३३२ बॅटऱ्यांपैकी २ लाख ६० हजार रुपये किंमतीच्या ५१ बॅटऱ्यांची परस्पर विल्हेवाट लावून ट्रान्सपोर्ट व्यावसायिकाची फसवणूक केल्याचा प्रकार केडगाव बायपास चौक परिसरात घडला आहे.

याबाबत हरियाणा राज्यातील ट्रान्सपोर्ट व्यावसायिक जनरेल सिंह अमरजित सिंह (वय ३६, रा. यमुना नगर, हरियाणा) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्याकडे प्रवीण ओमपाल (रा. मंसूरपूर, उत्तरप्रदेश) हा वाहनचालक कामाला होता. त्याच्या ताब्यात असलेल्या ट्रक मध्ये एक्साईड कंपनीच्या १३३२ बॅटऱ्या या पुणे येथे पोहोच करण्यासाठी देण्यात आलेल्या होत्या. त्याने पुण्याकडे जाताना नगरच्या केडगाव बायपास चौक परिसरात या १३३२ बॅटऱ्यांपैकी २ लाख ६० हजार रुपये किंमतीच्या ५१ बॅटऱ्यांची परस्पर विल्हेवाट लावली.

ही घटना २८ सप्टेंबर रोजी दुपारी १२ ते रात्री ८ या दरम्यान घडली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

या फिर्यादी वरून पोलिसांनी ट्रक चालक प्रवीण ओमपाल याच्या विरुद्ध बीएनएस कलम ३१६ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



सारोळा कासार येथे हनुमान मंदिरात झालेल्या विटंबनेनंतर महाआरती केल्यानंतर झालेल्या सभेत बोलताना आ.संग्राम जगताप. यावेळी उपस्थित ग्रामस्थ.

### सारोळा कासार येथील झालेल्या विटंबनेनंतर

# आ.संग्राम जगताप यांनी केली हनुमान मंदिरात 'महाआरती'

नगर - घटस्थापनेच्या दिवशी नगर तालुक्यातील सारोळा कासार येथे हनुमान मंदिरात झालेल्या विटंबनेनंतर आ. संग्राम जगताप यांनी ३ ऑक्टोबर रोजी सकाळी गावात भेट देत हनुमान मंदिरात महाआरती केली. यावेळी गावातील हिंदू समाजबांधव उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. जगताप म्हणाले, हे जिहादी लोक संपूर्ण देशभरात अशा घटना जाणीवपूर्वक घडवून आणत आहेत. त्यामुळे हिंदू समाजाने आता जागरुक झाले पाहिजे, एकजूट दाखविली पाहिजे तरच या घटना थांबतील नाहीतर भविष्यात हे लोक आपल्या घरापर्यंत आल्या शिवाय राहणार नाहीत. त्यांचा छुपा अजेंडा आपण समजून घेतला पाहिजे. आजपर्यंत झाला तेवढा भाईचारा खूप झाला. यापुढे यांच्यापासून सावध राहत यांच्या नांग्या जाग्यावरच ठेचण्याची वेळ आली आहे. तरुण वर्ग आता जागा होत आहे. त्यामुळे वयोवृद्धांनी त्यांच्या सोबत जाता येत नसले तरी त्यांना धर्म कार्यासाठी आडकाठी न घालता संमती द्यायला हवी, असे आवाहन त्यांनी केले.

या घटनेचा तपास पोलिसांनी तातडीने लावून आरोपींना अटक करावी. हा प्रकार दाबण्याचा प्रयत्न करू नये, नाहीतर भविष्यात याचा आणखी उद्रेक होईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्याख्याती प्रणाली कडूस हिने केले.

माजी सरपंच रविंद्र कडूस यांनी यावेळी घटनेचा घटनाक्रम सांगितला. संजय काळे यांनी आभार मानले.

यावेळी नगर बाजार समितीचे माजी सभापती अभिलाष घिगे, माजी उपसभापती रेवणनाथ चोभे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# धार्मिक द्वेष निर्माण करण्याच्या उद्देशाने प्रक्षोभक भाषण देवून 'हेट स्पिच' देणाऱ्यांवर कारवाई करावी

### मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळाची मागणी; शहर व जिल्ह्यात जातीय तणाव निर्माण करणाऱ्या व्यक्तीविरोधात त्यांचा पक्ष न पाहता कठोर कारवाई करावी : उपमुख्यमंत्री अजीत पवार

नगर - शहरातील मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळाने २ ऑक्टोबर रोजी पारनेर येथे उपमुख्यमंत्री अजीत पवार यांची भेट घेऊन शहरासह जिल्ह्यात जाणीवपूर्वक जातीय तणाव निर्माण करणाऱ्याच्या घटना वारंवार घडत असल्याप्रकरणी लक्ष वेधले. उपमुख्यमंत्री पवार यांनी या प्रश्नावर मुस्लिम समाजातील शिष्टमंडळाशी सविस्तर चर्चा केली. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना बोलावून शहर व जिल्ह्यात जातीय तणाव निर्माण करणाऱ्या व्यक्तीविरोधात त्यांचा पक्ष न पाहता कठोर कारवाई करावी, असे आदेश उपमुख्यमंत्री पवार यांनी दिले. शहरात वाढणारे जातीय तणाव पाहता पोलीस प्रशासनाने कोणतीही व्यक्ती असू द्या, त्याची पर्वा न करता त्याच्याविरोधात कारवाई करावी व प्रत्येक ठिकाणी मोहल्ला कमिटी तयार करून जातीय तणाव कमी होण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश दिले.



मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळाने पारनेर येथे उपमुख्यमंत्री अजीत पवार यांची भेट घेऊन शहरासह जिल्ह्यात जाणीवपूर्वक जातीय तणाव निर्माण करणाऱ्याच्या घटना वारंवार घडत असल्याप्रकरणी लक्ष वेधले.

कोठला येथे झालेल्या रास्ता रोको आंदोलनाच्या आरोपींपैकी अनेक आरोपी घटनेशी संबंध नसताना अटक करण्यात आली आहे, त्यांची नावे वगळावी. पोलिसांनी इतर आरोपांच्या नावाखाली सदर गुन्ह्याशी संबंध नसलेल्या व्यक्तींना त्रास देत आहे ते त्वरित थांबवावे. पोलीस प्रशासनाने मॉर्निंग राऊंड वाढवावे. जे लोक समाजात धार्मिक द्वेष निर्माण करण्याच्या उद्देशाने प्रक्षोभक भाषण करत आहेत अशा व्यक्ती विरोधात हेट स्पिच प्रकरणी पोलिसांनी स्वतःहून कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

मुस्लिम समाजातील शिष्टमंडळाने सांगितले की, मागील १० महिन्यांपासून काही लोकप्रतिनिधी व जातीयवादी संघटनेचे लोक वारंवार तणाव निर्माण होईल असे वक्तव्य करत आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्यासाठी जाणून-बुजून कृत्य सुरु आहे. पोलीस प्रशासन त्यांच्या विरोधात कारवाई करत नसल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. त्याचीही उपमुख्यमंत्री पवार यांनी गांभीर्यपूर्वक दखल घेतली आहे.

जिल्ह्यात मुस्लिम समाजाला टार्गेट करुन हिंदू-मुस्लिमांमध्ये भांडणे लावली जात असल्याने अल्पसंख्यांक असलेला मुस्लिम समाज भितीच्या सावटाखाली वावरत आहे. शहरात अशांतता निर्माण झाली असल्याने त्याचा रोजगार, व्यापार व स्थानिक बाजारपेठेवर दुष्परिणाम झाला आहे. वारंवार घटना घडत असल्याने ग्रामीण भागातील मुस्लिम समाजाला असुरक्षित वातावरण निर्माण झाले असल्याचे प्रश्न यावेळी उपस्थित करण्यात आले.

याप्रसंगी उबेद शेख, हाजी शौकत तांबोळी, माजी उपमहापौर हाजी नजीर शेख, शाकीर शेख, माजी समाज कल्याण अधिकारी रफिक मुन्शी, सय्यद खलील, शफी जहागीरदार, अथर खान, इंजि. अख्तर, मतीन सय्यद, राजू सुपेवाले, ॲड. सय्यद अख्तर, मोबीन मुल्ला तांबटकर, फारुक बागवान, डॉ. रिजवान शेख, ॲड. हाफिज जहागीरदार, माजी पोलीस अधिकारी रऊफ रोख, ॲड. मोबीन, फैय्याज जहागीरदार, फैरोज सय्यद आदी उपस्थित होते.

आय लव्ह मोहम्मद रांगोळी विटंबना प्रकरणावरुन शहरात जातीय तणाव निर्माण करण्यात आलेला आहे. यामधील आरोपी व त्याच्या कुटुंबीयांची गुन्हेगारी पार्श्वभूमी तपासून त्याला हद्दपार करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. तर हे कृत्य घडविण्यास भाग पाडणारा मास्टर माईंड शोधण्याची देखील मागणी शिष्टमंडळाने केली.

# पाईपलाईन रोडवरून मोटारसायकलची चोरी; गुन्हा दाखल

नगर - अपार्टमेंटच्या पार्किंग मध्ये लावलेली मोटारसायकल (क्र. एम एच १६ डीए ७७७९) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना पाईपलाईन रोडवरील मोरया मंगल कार्यालयाजवळ असलेल्या संत कृपा अपार्टमेंट येथे २ ऑक्टोबर रोजी पहाटे १२.३० ते सकाळी ९ या कालावधीत घडली.

याबाबत राजदत्त माणिक झगडे (वय २१, रा.संत कृपा अपार्टमेंट, पाईपलाईन रोड) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध बीएनएस कलम ३०५ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# एसटी चालकाने तारकपूर स्थानकामधील बसमध्येच गळफास घेत केली आत्महत्या

नगर - कर्तव्यावर असताना मद्यपान केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर एका एसटी चालकाने बसमध्येच गळफास घेऊन आपले जीवन संपवल्याची घटना तारकपूर बस स्थानक परिसरात घडली. सुरेश चंद्रभान धामोरे (वय ५५, रा. सारोळा कासार, ता. नगर) असे आत्महत्या केलेल्या चालकाचे नाव आहे. या घटनेमुळे एसटी महामंडळात एकच खळबळ उडाली आहे.



सुरेश धामोरे (मयत)

मिळालेल्या माहितीनुसार, तारकपूर आगारातील एका एसटी बसमध्ये एका व्यक्तीने गळफास घेतल्याची माहिती तोफखाना पोलिसांना २ ऑक्टोबर रोजी सकाळी मिळाली. माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी सदर व्यक्तीला पुढील उपचारासाठी जिल्हा रूग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषीत केले. आत्महत्येची माहिती कळताच परिसरात एसटी कर्मचार्‍यांनी मोठी गर्दी केली होती. यासंदर्भात तोफखाना पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

दरम्यान, १ ऑक्टोबर रोजी तारकपूर आगाराचे वाहतूक नियंत्रण शिवाजी मारुती खजिनदार यांनी चालक धामोरे यांच्याविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. फिर्यादीनुसार, चालक धामोरे हे तारकपूर-घोसपुरी बसवर कर्तव्यावर असताना त्यांनी मद्यप्राशन केल्याचा संशय आला होता. वरिष्ठ अधिकार्‍यांलच्या सूचनेनुसार त्यांची वैद्यकीय तपासणी केली असता, त्यांनी मद्य सेवन केल्याचे सिध्द झाले. या प्रकरणी त्यांच्यावर दारूबंदी अधिनियम कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. या कारवाईच्या धक्क्याने किंवा बदनामीच्या भीतीने धामोरे यांनी हे टोकाचे पाऊल उचलले असावे, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

दरम्यान मयत धामोरे हे सारोळा कासार गावचे माजी सरपंच होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, ३ भाऊ, भावजया, पुतणे असा परिवार आहे.

# गुटखा, सुगंधी तंबाखूची तस्करी करणाऱ्याला पकडले

### सव्वातीन लाखांचा मुद्देमाल जप्त

नगर - गुटखा व सुगंधी तंबाखूची मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर वाहतूक करणार्या व्यक्तीला कोतवाली पोलिसांनी २ ऑक्टोबर रोजी पहाटे सापळा रचून वाहनासह ताब्यात घेतले. या कारवाईत सुमारे ३ लाख १३ हजार ४०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संशयिताविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



गुटखा व सुगंधी तंबाखूची तस्करी करणाऱ्याला पकडल्यानंतर त्याच्यासमवेत कोतवालीचे पथक.

कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांना माहिती मिळाली की, एका काळ्या रंगाच्या कारमधून गुटख्याचा साठा शहरात आणला जाणार आहे. त्यानुसार त्यांनी दिलेल्या आदेशावरून पोलिसांनी सापळा लावला असता दीपक पोपटराव लोखंडे (रा. लोखंडेवाडी ता.श्रीगोंदा) हा व्यक्ती कार (क्र.एमएच १६ एबी ३८५१) मध्ये गुटखा घेऊन येताना सापडला. पोलिसांनी केलेल्या तपासणीत वाहनातून १ लाख ४० हजार रूपये किमतीचा गुटखा, १७ हजार ६०० रूपये किमतीची तंबाखूसह एकुण ३ लाख १३ हजार ४०० रूपये किमतीचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी दीपक लोखंडे याच्या सह त्याच्या सोबत असलेला नवीद तांबोळी या दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील नवीद तांबोळी हा पसार झाला आहे. ही कारवाई निरीक्षक गायकवाड, अन्न प्रशासनाचे निरीक्षक राजेश बडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक गणेश देशमुख व प्रवीण पाटील, अंमलदार संतोष बनकर, सुनील शिरसाठ, विजय ठोंबरे, सुरज कदम, शिरीष तरटे, दत्तात्रय कोतकर, सचिन लोळगे, दीपक रोहकले, याकुब सय्यद, संदीप कवळे यांच्या पथकाने केली.

## सौ. स्मिताताई भिसे यांचे निधन



नगर - येथील नालेगावातील रहिवासी सौ. स्मिता प्रसाद भिसे (वय ४१) यांचे २ ऑक्टोबर रोजी निधन झाले. ३ ऑक्टोबर रोजी त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, सासू असा परिवार आहे.

## भागिरथी बिडवे यांचे हृदयविकाराने निधन



नगर - बागडपट्टी राजा गणपती मंदिर समोर येथील रहिवाशी भागिरथी सुधाकर बिडवे (वय ७८) यांचे १ ऑक्टोबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, सून, ३ नातवंडे असा परिवार आहे. चंद्रकांत सुधाकर बिडवे यांच्या मातोश्री होत.

## सौ.सुमनबाई दिघे यांचे अल्प आजाराने निधन

श्रीरामपूर - येथील सौ.सुमनबाई बाबासाहेब दिघे (वय ७५) यांचे अल्पश: आजाराने निधन झाले.



त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन मुली, सुना, दिर, पुतणे, जावई, नातवंडे, नातसून असा परिवार आहे. श्रीरामपूर पोस्ट ऑफिसमधील सेवानिवृत्त पोस्टमन बाबासाहेब बाळाजी दिघे यांच्या पत्नी, प्रभात दूध डेअरीचे कर्मचारी दत्तात्रय दिघे व मधुकर दिघे यांच्या मातोश्री, प्रथमेश, अथर्व व यश दिघे यांच्या आजी होत.

CHANGE IN NAME
My Old Name was
GAWALI SARASWATI SHIVAJI
& My New Name is
SUVARNA SACHIN CHAVANDKE
both names are mine but I use
my name as
SUVARNA SACHIN CHAVANDKE
I also declare this in affidavit.
Affidavit No. : PHJ/NT-89/2025
Date : 19/09/2025

CHANG IN NAME
I Have Changed
My Old Name
Aashna Dilip Bajaj
To New Name
Aarushi Sandeep
Chhabriya

CHANG IN NAME
My old name is
Avinash Dattatraya
Shirapuri
Change to new name is
Avinash Dattatray
Shirapuri

# पैगंबरांचा अवमान करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करा

### जमाते उलमा हिंदचे जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना निवेदन

नगर - शहरातील माळीवाडा बारातोटी कारंजा भागात घडलेल्या रांगोळी प्रकरणामुळे मुस्लिम समाजामध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. इस्लाम धर्माचे प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या नावाची जमिनीवर रांगोळीतून विटंबना करण्यात आली असून, या प्रकारामुळे धार्मिक भावना दुखावल्या गेल्याने संबंधित आरोपी व त्यामागील सूत्रधारांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी जमाते उलमा हिंदने केली आहे. या पार्श्वभूमीवर जमाते उलमा हिंदच्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन निवेदन दिले. या शिष्टमंडळात जिल्हा सेक्रेटरी सय्यद खलील, शहराध्यक्ष मौलाना अब्दुल रौफ आलमगिरी, निसार बागवान, हाफिज समीर साब, हाफिज रियाज आलमगिरी, मौलाना इसाक, हाफिज नसीब खान, मौलाना अबूबकर, हाफिज अबुजर, हाफिज इर्शाद, मौलाना शोएब, मौलाना सिद्दिकी, हाफिज फैजान, मौलाना इस्माईल, हाफिज जैद, हाफिज उमेर, हाफिज ऐसान, मौलाना मुक्ती अब्दुल हक, तय्यबभाई मोमीन आदी उपस्थित होते.



पैगंबरांचा अवमान करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करा, या मागणीचे निवेदन जमाते उलमा हिंदच्यावतीने जिल्हा पोलीस अधीक्षकांना देण्यात आले.

संघटनेने दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, माळीवाडा परिसरात झालेली ही विटंबना केवळ धार्मिक भावना दुखावणारी नसून कायदा-सुव्यवस्था बिघडवण्यासाठी आखलेला कट असल्याचे स्पष्ट आहे. हा प्रकार दंगल प्रवृत्तीला खतपाणी घालणारा असून सार्वजनिक शांततेला तडा देणारा आहे. या घटनेमुळे देशात गंभीर तणाव निर्माण होण्याची शक्यता असून, आंतरराष्ट्रीय स्तरावरही भारताची प्रतिमा मलिन होऊ शकते. त्यामुळे दोषींवर तातडीने आणि कठोर कारवाई होणे अत्यावश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

जिल्ह्यात वेळोवेळी मुस्लिम समाजाला टार्गेट करून त्यांच्या भावनांचा अनादर करण्यात येत आहे. सातत्याने होणाऱ्या या छळामुळे सामाजिक सलोखा बिघडत असून संविधानाने दिलेल्या समता व न्यायाच्या मूल्यांनाही धक्का पोहोचत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अशा घटना थांबवण्यासाठी आणि मुस्लिम समाजाविरुद्ध होणारा अन्याय रोखण्यासाठी प्रशासनाने ठोस व प्रभावी पावले उचलावीत, अशी मागणी जमाते उलमा हिंदच्या वतीने करण्यात आली आहे.

# रेल्वे स्थानक येथे जाण्यासाठी सिटी बस व्यवस्था सुरू करण्यात यावी

नगर - नगर शहराचा विस्तार फार मोठा झाला असल्याने रेल्वे स्थानकावर जाण्यासाठी साधन मिळत नाही. त्यासाठी नगर स्टेशनवर जाण्यासाठी लवकरात लवकर सिटी बसची व्यवस्था करावी. सकाळी ७.३५ वा. नागपूरला जाण्यासाठी वंदे भारत नगर स्थानकावर येते. व यासाठी सिटी बस सुरु केल्यास नागरीकांच्या अडचणीचे निवारण होईल. सकाळी ८ वा. पुण्यास जाण्याकरीता अमरावती पुणे गाडी नगर स्थानकावर येते. या दोन्ही गाड्यांकरीता सकाळी लवकर सिटी बसची व्यवस्था केली तर नागरीकांची सोय होईल. व तसेच नगर रेल्वे स्टेशनवर बऱ्याच गाड्या येतात. त्याकरीताही तुम्ही सिटी बसची व्यवस्था केल्यास नागरीकांच्या अडचणीचे निवारण होईल. रेल्वे स्टेशनवरुन व माळीवाडा बस स्टॅण्ड करीता सुध्दा सिटी बस सुरु करावी. जेणेकरुन बाहेरगावच्या लोकांची सुध्दा व्यवस्था होईल.



अनिल सबलोक

तरी आपण स्टेशनवर येणे-जाण्यासाठी सिटी बसची व्यवस्था त्वरीत करावी, अशी मागणी रेल्वे बोर्डचे जिल्हाध्यक्ष अनिल सबलोक यांनी महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे केली आहे.

# जलतरण तलावासह वाडियापार्क क्रीडा संकुल राज्याच्या निधीतून लवकरच अद्ययावत होईल

### आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; नॅशनल अ‍ॅकॅडमी व साई स्विमिंग अ‍ॅकॅडमी यांच्या माध्यमातून ब्लू फ्लाय पूल्स वाडिया पार्क जलतरण तलाव सुरू



नॅशनल अ‍ॅकॅडमी व साई स्विमिंग अ‍ॅकॅडमी यांच्या माध्यमातून ब्लू फ्लाय पूल्स हा वाडिया पार्क जलतरण तलावाचे उद्घाटन करण्यात आले.

नगर - वाडिया पार्क क्रीडा संकुलाची जागा तत्कालीन नगरपालिकेत राज्य सरकारला हस्तांतरित करण्यात आली आणि त्याचा विकास होईल असे वाटले परंतु तेथे बांधा वापरा आणि हस्तांतरित करा या तत्त्वावर क्रीडा संकुल बांधले गेले त्यातील व्यापारी गाळे डेव्हलप झाले पण आपले ग्राउंडचे काहीच झाले नाही. आता हा ऑलिम्पिक दर्जाचा स्विमिंग पूल ब्लू फ्लाय पूल्स आणि साई स्विमिंग अ‍ॅकॅडमी, नॅशनल स्विमिंग अ‍ॅकॅडमीने चालवण्यास घेतला आहे. आपणही वाडिया पार्क क्रीडा संकुलाचे अद्ययावत पद्धतीने नूतनीकरण व्हावे यासाठी राज्य शासनाकडून भरीव निधी आणला आहे, त्यामुळे जलतरण तलावासह संकुल अद्ययावत होईल असा विश्वास आमदार संग्राम जगताप यांनी व्यक्त केला.



नॅशनल स्विमिंग अ‍ॅकॅडमी साई स्विमिंग अ‍ॅकॅडमी यांच्या माध्यमातून ब्लू फ्लाय पूल्स हा वाडिया पार्क जलतरण तलाव सुरू झाला आहे. त्याचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, छत्रपती संभाजीनगरचे पोलीस सहाय्यक आयुक्त संपत शिंदे, जैन ओसवाल संघाचे उपाध्यक्ष राजेंद्र चोपडा, कराळे क्लब हाऊसचे संस्थापक करण कराळे यांच्या हस्ते झाले. फित कापून उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी बोलताना ते म्हणाले पुढे की, वाडिया पार्क क्रीडा संकुल लवकरच अदयावत होणार आहे ज्या पद्धतीने आपण कालची भारत पाकिस्तान मॅच ब्लड लाईट मध्ये पाहिली. भारताने पाकिस्तानवर छातीवर बसून विजय मिळवला. त्याच पद्धतीने नगरमध्ये आंतरराष्ट्रीय मॅचेस होतील. या पद्धतीने क्रीडा संकुल राज्य शासनाच्या निधीमधून साकारले जाणार आहे. ब्लू फ्लाय पूलच्या संचालिका सारिका गांधी व नॅशनल स्कूल अ‍ॅकॅडमी संस्थापक सर्वेश देशमुख हे दोघेही जलतरण पटू असून ते आपल्या क्षेत्रात नावाजलेले आहेत. त्यामुळे या स्विमिंग पूल मध्ये सराव करणाऱ्या जलतरणपटूंना चांगला स्विमिंग टँक उपलब्ध झाला आहे. तलाव चालवताना कोणतीही अडचण आली तरी आपण ती सोडवू असे आश्वासन जगताप यांनी दिले.

यावेळी उपस्थितांचा सत्कार करण्यात आला. जलतरणपटू अम्रीत सिंग राजपूत, तनवी आवटे, अनुष्का बांगर, श्रीयांश देशमुख, ऋतुराज डापसे, विश्वराज डापसे, स्वराली तांदळे, काव्या मराठे, कादंबरी सांगळे यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांचे भाषण झाले. जिल्हा क्रीडा संकुल समितीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी जिल्हा पोलीस अधीक्षक तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अन्य सदस्यांच्या मान्यतेने हा पूल पुन्हा सुरू झाला आहे. तो चांगल्या पद्धतीने चालवला जाईल. संस्थापिका सारिका गांधी आणि प्रशिक्षक सर्वेश देशमुख हे चांगल्या पद्धतीने खेळाडू घडवतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी उद्योजक नरेंद्र फिरोदीया, मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी देखील सारिका गांधी आणि देशमुख यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

संचालिका सारिका गांधी या हैदराबाद येथील दोन जलतरण तलाव चालवत असून निल्स वॉटर वर्ल्ड इन्स्टिट्यूटमध्ये लाईफ गार्ड कोच आणि ट्रेनरचा त्यांनी सर्टिफिकेट कोर्स प्रशिक्षक म्हणून पूर्ण केला आहे.

सर्वेश देशमुख हे वयाच्या आठव्या वर्षापासून स्विमिंग करत असून शालेय जीवनापासून महाराष्ट्र स्टेट, एस एफ आय च्या नॅशनल मॅचेस मध्ये त्यांना मेडल आहे. त्यांच्या साई कोच एज्युकेशन प्रोग्रामला दोन सेफ्टी अ‍ॅवॉर्ड मिळाले आहेत. सरांच्या विद्यार्थी स्कूल कॉम्पिटिशन स्टेट कॉम्पिटिशन मध्ये मिळतात त्यामुळे योग्य व्यक्तींच्या हाती हा पूल आहे, अशी प्रतिक्रिया यावेळी जलतरण तलावात नियमित सराव करणाऱ्या खेळाडू आणि नागरिकांनी व्यक्त केली.

यावेळी वीरेन सुरम, शिरीष नलावडे, वेदांत कराड, गौरव घोडके यांचा देखील सत्कार झाला.



शालेय राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेले एकलव्य तायक्वांदो अकॅडमीचे खेळाडू गौरी दळवी व प्रांजल पोटे यांच्या समवेत खेळाडू व प्रशिक्षक. (छाया - अमित मन्यार)

## एकलव्य तायक्वांदो अकॅडमीचे खेळाडू गौरी दळवी व प्रांजल पोटे यांची शालेय राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

नगर - क्रीडा व युवक सेवा संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय पुणे यांच्यावतीने शालेय विभागीय तायक्वांदो स्पर्धा नुकत्याच न्यू इंग्लिश स्कूल, लांडेवाडी, तालुका आंबेगाव, जिल्हा पुणे येथे ३० सप्टेंबर व १ ऑक्टोबर रोजी झाल्या. या स्पर्धेमध्ये एकलव्य तायक्वांदो अकॅडमीच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत अहिल्यानगरसाठी एकूण ६ पदके कमावली.

सुवर्णपदकासाठी मानकरी ठरले. गौरी दळवी, प्रांजल पोटे रोप्य पदकाचे मानकरी, वैभवराजे कोतकर, अदिती धावड कास्यपदकाचे मानकरी, अमित लोंढे, अभिषेक सैनी, गौरी दळवी व प्रांजल पोटे या खेळाडूंची छत्रपती संभाजीनगर येथे १३ ते १६ ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या शालेय राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांना प्रशिक्षक योगेश बिचीतकर, सचिन मरकड, मंगेश आहेर यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल एकलव्य तायक्वांदो अक्ॅडमीचे अध्यक्ष दिलीप सातपुते, सचिव गणेश वंजारे, ग्रँड मास्टर अल्ताफ खान, तायक्वांदो स्पोर्ट्स असोसिएशन अहिल्यानगरचे अध्यक्ष प्राध्यापक माणिकराव विधाते, सचिव घनश्याम सानप, खजिनदार धर्मनाथ घोरपडे, नगरसेवक विजय पठारे, एन.आय. एस कोच मच्छिंद्र साळुंखे यांनी अभिनंदन केले.



साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त... दसरा या मंगलक्षणी चंदूकाका ज्वेलस, सावेडी येथील सुवर्णदालनात ग्राहकांनी दागिने खरेदी करून मंगलक्षण साजरा केला.

# धनादेश न वटविल्या प्रकरणी आरोपीस ६ महिन्याची सक्षम कारावासाची शिक्षा

नगर - अहमदनगर येथील प्रतिष्ठित व्यापारी शांती लॉटरी एजन्सीचे चालक अनिल बाबुलाल कटारिया (अर्बन बँक रोड, कापडबाजार व रा. आगरकरमळा - शिवनेरीमार्ग - स्टेशन रोड, अहमदनगर) यांनी रमेश आसाराम पवळ (रा. भिंगार - अहमदनगर, मिलीट्री - खात्यामध्ये नोकरीस) यास त्याचे आर्थिक अडचणीचे कारणास्तव केवळ त्यास आर्थिक मदत करण्याच्या उद्देशाने मोठी रक्कम हातउसणवार दिली होती. सदर रकमेच्या परतफेडीपोटी सदर आरोपीने फिर्यादी यांना त्याचे बँक खात्याचा धनादेश दिलेला होता. मात्र सदरचा दिलेला धनादेश हा सदर आरोपीने जाणिवपुर्वक न वटविल्याने सदर फिर्यादी यांनी सदर आरोपीविरुध्द न वटलेल्या धनादेशाबाबत एन.आय. अ‍ॅक्टचे कलम १३८ अंतर्गत फौजदारी केस अहमदनगर न्यायालयामध्ये दाखल केलेली होती. सदर आरोपीने सदर केसमध्ये फिर्यादी यांचेवर विविध प्रकारचे आरोप करुन याउलट फिर्यादीची मोठी रक्कम परत न करण्याच्या दुष्ट हेतुने व त्याद्वारे सदर फौजदारी प्रकरणामधुन स्वतःची बेकायदेशीरपणे सुटका करुन घेण्याच्या गैरइराद्याने सदर केसमध्ये जाणिवपुर्वक खोटे व लबाडीचे वेगवेगळे बचाव घेऊन त्याद्वारे सदर कोर्टाची जाणिवपुर्वक दिशाभुल करण्याचा प्रयत्न केला असता सदरच्या सर्व बेकायदेशीर बाबी फिर्यादी यांनी सबळ पुराव्यांच्या आधारे सदर कोर्टाचे निदर्शनास आणुन दिल्या असता कोर्टाने सदरच्या सर्व कायदेशीर बाबींचा कायदेशीर मार्गाने विचार करुन सदर आरोपीस फौजदारी प्रकरणामध्ये दोषी धरुन सदर आरोपीस ६ महिन्याची सक्षम कारावासाची शिक्षा ठोठावलेली असुन सदर चेकची रक्कम चेकच्या तारखेपासुन संपुर्ण व्याजासह परत करणेबाबतचे आदेश करुन सदरची रक्कम फिर्यादी यांना एक महिन्यात देण्याबाबतचे आदेश करुन मात्र सदरची रक्कम एक महिन्यात परत न केल्यास आणखी २ महिन्याची कारावासाची शिक्षा ही नुकतीच सुनावलेली आहे.

फिर्यादी अनिल बाबुलाल कटारिया यांच्यातर्फे ज्येष्ठ विधिज्ञ एस. पी. भारदे व अ‍ॅड. एन. एम. हराळे यांनी संपुर्ण कोर्ट कामकाज पाहिलेले असुन त्यांना अ‍ॅड. अक्षय नजन व अ‍ॅड. वैभव लोंढे यांनी सहकार्य केलेले आहे.





तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेमध्ये विजेते ठरलेले माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलचे विद्यार्थ्यांसमवेत मुख्याध्यापिका जयश्री खरात, क्रीडा शिक्षक किशोर उबाळे, मुजाहिद शेख आदी.

## माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलचे तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत यश

नगर - नुकत्याच आर्मी स्कूल येथे पार पडलेल्या नगर तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेत माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. १७ वर्षे वयोगटातील लांब उडी प्रकारामध्ये साक्षी राठोड हिने प्रथम क्रमांक व २०० मीटर धावणे प्रकारात तृतीय क्रमांक तर दक्ष अंकुश ह्याने थाळी फेकमध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. दोघांचीही प्रवरानगर येथे होणाऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच चौदा वर्षे वयोगटातील गोळा फेक प्रकारात शिफा शेख हीने तृतीय क्रमांक पटकाविला. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापिका जयश्री खरात यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक किशोर उबाळे व मुजहिद शेख यांचे मार्गदर्शन लाभले.

## ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने मानव सेवा प्रकल्पास व मातोश्री वृद्धाश्रमास किराणा वाटप



मानव सेवा प्रकल्पास व मातोश्री वृद्धाश्रमास ज्येष्ठ नागरिक संघातर्फे किराणा वाटप करण्यात आले. (छाया - समीर मन्यार)

नगर - ज्येष्ठ नागरिक संघ स्टेशन परिसराच्या वतीने नेहमी विविध सामाजिक उपक्रम साजरे केले जातात. सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून परिसर स्वच्छता. समाजापासून वंचित असणाऱ्या घटकांना आधार देणे. ज्येष्ठांना मायेची ऊब देणे त्यांच्या विरुंगुळ्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करणे. असे विविध उपक्रम साजरे केले जातात. ज्येष्ठ नागरिक दिन सालाबाद प्रमाणे साधेपणाने साजरा केला जातो. याही वर्षी ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त अरणगाव येथील मानव सेवा प्रकल्प तसेच वेळेत घाट येथील मातोश्री वृद्धाश्रमाला दसरा, दिवाळीनिमित्त किराणा व खाऊचे वाटप करून ज्येष्ठ नागरिक दिन साजरा करण्यात आला असल्याची माहिती संघाचे अध्यक्ष के डी खानदेशे यांनी दिली.

यावेळी संघाचे अध्यक्ष के.डी. खानदेशे, सचिव अशोक आगरकर, खजिनदार दत्तात्रेय फुलसौंदर, शिवाजीराव ससे, उपाध्यक्ष नानासाहेब दळवी, ज्ञानेश्वर कवीटकर, भागवत बांदल जवाहरलाल मंत्री, शामला साठे, जोशी मॅडम, पात्रे मॅडम, विकास मुळे, नूरआलम शेख, चंद्रकांत पुंड, ओंकारेश्वर झावरे, मानव सेवा प्रकल्पाचे अंबादास गुंड, ऋतिक बरडे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मानस सेवा प्रकल्पाचे अंबादास गुंजाळ म्हणाले की मानव सेवा प्रकल्पात रस्त्यावर फिरत असलेल्या बेवारस ज्यांना कोणीच आधार नसतो परिस्थितीमुळे मनोरुग्ण झालेल्या रुग्णांची सेवा केली जाते. याला कोणताही शासकीय फंड नसून सर्व समाजातील ज्येष्ठ नागरिक संघासारख्या सेवाभावी संस्थेच्या मदतीवर त्यांची सेवा केली जाते. आतापर्यंत महाराष्ट्र व महाराष्ट्रातून बाहेरील राज्यातील २२०० मनोरुग्णांवर उपचार करून त्यांना त्यांच्या कुटुंबांकडे सुपूर्त केले असल्याचे ते म्हणाले.



अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे माजी प्रमुख कार्यवाह स्व. अशोकभाऊ फिरोदिया यांच्या जयंतीनिमित्त संस्थेमधील सर्व शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव व पारितोषिक वितरण समारंभाच्या कार्यक्रमात शिक्षणाधिकारी संध्याताई गायकवाड. शेजारील छायाचित्रात सोसायटीच्यावतीने पूरग्रस्तांना मदतीचा धनादेश देण्यात आला.

# नवीन शैक्षणिक धोरणाचा स्विकार करुन शिक्षकांनी अपडेट व्हावे

### शिक्षणाधिकारी संध्याताई गायकवाड यांचे प्रतिपादन; स्व. अशोकभाऊ फिरोदिया यांच्या जयंतीनिमित्त संस्थेतील गुणवंताचा गौरव

नगर - इंटरनेटमुळे शिक्षक-विद्यार्थी जवळ आले आहे. नवीन शैक्षणिक धोरणाने वाटचाल करताना दैनंदिन जीवन आणि शिक्षण यांची जोड घालावी लागणार आहे. तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकांना अपडेट व्हावे लागणार आहे. विद्यार्थ्यांसमोर शिक्षक हा एक आयडॉल असतो. ब्रिटिश काळात स्थापन झालेल्या अहमदनगर एज्युकेश सोसायटीने आपली गुणवत्ता आजही जपली असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदचे (माध्यमिक) शिक्षणाधिकारी संध्याताई गायकवाड यांनी केले.

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे माजी प्रमुख कार्यवाह स्व. अशोकभाऊ फिरोदिया यांच्या जयंतीनिमित्त संस्थेमधील सर्व शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव व पारितोषिक वितरण समारंभाच्या अध्यक्षीय भाषणात शिक्षणाधिकारी गायकवाड बोलत होत्या. या कार्यक्रमास संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, उपाध्यक्ष अशोक मुथा, सहकार्यवाह गौरव फिरोदिया, खजिनदार प्रकाश गांधी, सल्लागार मंडळाचे सदस्य आशाताई फिरोदिया, भूषण भंडारी, शैलेश मुनोत, पुष्पाताई फिरोदिया, तसेच मिनाताई बोरा, रविंद्र बाकलीवाल, जालिंदर बोरुडे, भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक उल्हास दुगड, अशोकभाऊ फिरोदिया हायस्कूलचे मुख्याध्यापक प्रभाकर भाबड, रुपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक अजय बारगळ आदींसह संस्थेच्या सर्व शाळांचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक प्रतिनिधी उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून करण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांनी संगीत शिक्षक परशुराम मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली ईश्वस्तवन व स्वागतगीत सादर केले.

प्रास्ताविकात छायाताई फिरोदिया म्हणाल्या की, स्व. अशोकभाऊ फिरोदिया यांनी त्यांच्या कार्यकाळात विविध उपक्रम राबवून संस्थेच्या शाळांना प्रगतीपथावर नेले. शैक्षणिक, कला, क्रीडा धोरणांना चालना दिली. त्यांच्या ध्येय-धोरणाने यशस्वी वाटचाल संस्था करीत असून, शैक्षणिक गुणवत्तेसह कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात विद्यार्थी आघाडीवर असल्याचे त्यांनी सांगितले.

पाहुण्यांचा परिचय मुख्याध्यापक उल्हास दुगड यांनी करुन दिला. अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या सर्व शाळांमधील ९९ गुणवंत विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलने मुख्यमंत्री स्वच्छ शाळा-सुंदर शाळा या उपक्रमांतर्गत तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवून तीन लाख रूपयांचे बक्षीस मिळवल्याबद्दल शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

सूत्रसंचालन सचिन पवार व शुभांगी जोशी यांनी केले. मुख्याध्यापक अजय बारगळ यांनी आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### पूरग्रस्तांना आधार देण्यासाठी अहमदनगर एज्युकेशन सोसायटीची मदत

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने महाराष्ट्रात अतिवृष्टीने निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीने फटका बसलेल्या ५० पूरग्रस्त कुटुंबियांसाठी २ लाख रुपये किमतीचे जीवनावश्यक वस्तूसंच (किराणा व भांडी सेट) देण्याचे जाहीर करण्यात आले. लवकरच ही मदत पूरग्रस्तांना पाठविण्यात येणार असल्याचे संस्थेच्या वतीने माहिती देण्यात आली.

# रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनी अन्नधान्याचे किटस् व ब्लँकेट्सची मदत

नगर - राज्यभर झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक गावांमध्ये नद्यांना पूर आले आहेत. शेतजमिनी मधील माती व पिके वाहून गेली असून पावसामुळे मोठ्या प्रमाणावर हानी झाली आहे. या आव्हानात्मक परिस्थितीत पूरग्रस्त नागरिकांना आणि शेतकऱ्यांना मदत करणे व त्यांच्या पाठीशी उभे राहणे ही रोटरी ची जबाबदारी आहे. आणि त्यासाठी आम्ही रोटरी चे सर्व सदस्य युवान या सामाजिक संस्थेबरोबर काम करीत आहोत असे प्रतिपादन प्रेसिडेंट अनुराधा आठरे यांनी केले आहे.

सर्व सदस्यांनी या संकटात एकत्र येऊन माणुसकी जपूयात अशी हाक रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनीच्या प्रेसिडेंट ने दिली व ताबडतोब सदस्यांनी प्रतिसाद दिला.

दैनंदिन गरजेच्या वस्तूंचा समावेश असलेले १०० अन्नधान्याचे किटस व १०० ब्लँकेट्स अशी मदत क्लब तर्फे पूरग्रस्तांसाठी केली गेली. या मदतीचे हे किटस युवानचे संदीप कुसाळकर यांच्याकडे नुकतेच सोपविण्यात आले. यावेळी प्रेसिडेंट रोटेरियन अनुराधा आठरे, रोटेरियन गीता गिल्डा, रोटेरियन आशाताई फिरोदिया, रोटेरियन मीनल बोरा, रोटेरियन प्रतिभाताई धूत, रोटेरियन मंजू मुनोत, रोटेरियन स्वाती पोखरणा, रोटेरियन लता भगत, रोटेरियन देवीका रेळे, रोटेरियन छायाताई फिरोदिया, मीनल काळे उपस्थित होते.





पूरग्रस्तांना रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनीतर्फे अन्नधान्याचे किटस् व ब्लँकेट्सची मदत करण्यात आली.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## हरपला माऊंट फुजीवरील बर्फ



जपानच्या भौगोलिक नकाशातच नव्हे, तर सांस्कृतिक जीवनातही माऊंट फुजीला स्थान आहे. या पर्वतशिखराकडे जपानी लोक अत्यंत प्रेमाने आणि आस्थेने पाहत असतात. या शिखरावर ऑक्टोबरच्या सुरुवातीपासूनच बर्फ दिसू लागतो. परंतु, नोव्हेंबर जवळ येऊनही जपानच्या या प्रसिद्ध शिखरावर अद्याप बर्फ दिसलेला नाही. देशाच्या हवामान संस्थेच्या म्हणण्यानुसार, १३० वर्षांपूर्वी पर्यावरणीय हालचालींची नोंद सुरू झाल्यापासून पहिल्यांदाच अशी विलक्षण घटना घडली आहे. साधारणपणे ऑक्टोबरच्या सुरुवातीला माऊंट फुजीच्या शिखरावर बर्फ दिसण्यास सुरुवात होते. हे उन्हाळी गिर्यारोहणाच्या हंगामानंतर हिवाळा सुरू होण्याचे संकेत देते. परंतु, बुधवारपर्यंत माऊंट फुजीवर बर्फ दिसला नाही, असे कोफू स्थानिक हवामान कार्यालयातील हवामान अंदाज वर्तक युताका कात्सुता यांनी सांगितले.

१८९४ पासून कोफूच्या हवामान कार्यालयाने सामान्यत: फुजी पर्वतावर हंगामातील पहिल्या हिमवर्षावाची नोंद केली आहे. परंतु, यावर्षी वाढत्या तापमानामुळे शिखरावर बर्फ पडलेला नाही. कोफू कार्यालयातील हवामान अधिकारी शिनिची यानागी यांनी 'सीएनएन'ला सांगितले की, जपानमध्ये उन्हाळ्यापासून तापमानवाढ आणि पाऊस कायम आहे, त्यामुळे बर्फवृष्टी झाली नाही. हा उन्हाळा जपानमधील सर्वात उष्ण उन्हाळा असल्याचे सांगितले जात आहे. जून ते ऑगस्ट या कालावधीत सरासरी तापमान नेहमीच्या पातळीपेक्षा १.७६ अंश सेल्सिअस वाढले होते. सप्टेंबरमध्ये तापमान अपेक्षेपेक्षा जास्त होते; कारण उष्णकटिबंधीय प्रवाहात उत्तरेकडील बदलामुळे दक्षिणेकडून गरम हवा जपानच्या दिशेने आली. उन्हाळ्याची तीव्र उष्णता ऑक्टोबरमध्ये चांगलीच वाढली, पहिल्या आठवड्यात ७४ हून अधिक शहरांमध्ये तापमान ३० डिग्री सेल्सिअसपेक्षा जास्त होते. क्लायमेट सेंट्रलने केलेल्या संशोधनाच्या मते, जपानमधील ही असामान्य ऑक्टोबर हीट हवामान बदलामुळे तिप्पट वाढली आहे. हवामान शास्त्रज्ञ युताका कात्सुता यांनी सांगितले की, शिखरांवर हिमकप तयार होण्यास उशीर होतोय, याला हवामानातील बदल अंशतः जबाबदार असू शकतो. या उन्हाळ्यात तापमान जास्त होते आणि हे उच्च तापमान सप्टेंबरपर्यंत चालू राहिले; ज्यामुळे थंड हवा कमी झाली, असे त्यांनी 'एएफपी'ला सांगितले. यावर्षीची तीव्र उष्णता नैसर्गिक अल निनो हवामान पद्धतीवर अवलंबून होती. जीवाश्म इंधनाच्या वापरामुळे ही उष्णता आणखी वाढली आणि हेच हवामान संकटाचे प्राथमिक कारण असल्याचे वृत्त 'सीएनएन'ने दिले. माऊंट फुजीवर अद्याप बर्फ पडलेला नाही; ज्याचा परिणाम पर्यटन, स्थानिक अर्थव्यवस्था, अन्न आणि पाणीपुरवठा आणि अगदी स्थानिकांच्या आरोग्यावरदेखील दिसू शकतो आणि त्यांना ॲलर्जीसारखे लक्षणे दिसू शकतात.



## इथे दिवाळीच निषिद्ध!

कुठे कशा प्रथा असतील, हे काही सांगता येत नाही. दिवाळीचा सण देश-विदेशात सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा होत असतो; पण हिमाचल प्रदेशातील हमीरपूर येथील एका गावात कधीच दिवाळीचा सण साजरा केला जात नाही. हमीरपूर जिल्ह्यातील सम्मू या गावात दिवाळी साजरी तर केली जात नाहीच शिवाय या दिवशी कोणतेही पक्वान्नही तयार केले जात नाही. येथील लोकांच्या मान्यतेनुसार या गावाला एक शाप मिळालेला आहे. त्यामुळे या गावात दिवाळी होत नाही. जर कोणी हा नियम मोडला तर गावावर संकट येते किंवा अकाली मृत्यू होतो, असा समज आहे.

यंदाही हमीपूर जिल्हा मुख्यालयाच्या जवळ २५ किमी दूरवर असलेल्या सम्मू गावात दिवाळी साजरी झाली नाही. येथे शेकडो वर्षांपासून दिवाळी साजरी करण्यास मनाई आहे. दिवाळीला दीप तर पेटवले जातात; परंतु कोणी चुकूनही फटाके फोडले किंवा मिठाई किंवा पंचपक्वान्न बनवले तर गावात नक्कीच संकट येते अशी गावकऱ्यांची मान्यता आहे. लोकांना या गावाला शापमुक्त करण्यासाठी प्रयत्न देखील झाले होते. अनेकदा हे प्रयत्न झाले होते; परंतु सारे प्रयत्न वाया गेले आहेत. लोकांवर या शापाची इतकी भीती आहे की दिवाळीला लोक घराबाहेर पडण्यास देखील योग्य समजत नाहीत. शेकडो वर्षांपासून या गावात दिवाळी साजरी केली नाही. कोणी दिवाळी साजरी करण्याचा प्रयत्न केला तरी गावात कोणाचा ना कोणाचा तरी मृत्यू होतो किंवा संकट येते असे ठाकूर विधीचंद या बुजुर्गाने सांगितले. हा सण सुरू झाला की वाईट वाटते. कारण देशात इतर ठिकाणी सर्वत्र दिवाळी साजरी होते. आजूबाजूच्या गावात दिवाळी सण होतो.

आमच्या गावात हे होऊ शकत नाही, असे बीणा नावाच्या महिलेने सांगितले. गावाने या शापातून मुक्त होण्यासाठी अनेक होम हवन केले; परंतु यश आले नसल्याचे त्यांनी सांगितले. याबाबत एक दंतकथा सांगितली जाते व ती आपल्या देशात सतीप्रथा सुरू असतानाची आहे. दिवाळीच्या दिवशी या गावातील एक महिला आपल्या पतीसोबत सती गेली होती. महिला दिवाळीसाठी माहेरी जायला निघाली होती. तिचा पती राजाच्या दरबारात सैनिक होता. परंतु, महिला गावापासून काही अंतरावर असतानाच तिला समजले की तिच्या पतीचा मृत्यू झाला आहे. तेव्हा ती महिला गर्भवती होती. महिलेला हा धक्का सहन झाला नाही तिने पतीसोबत सती जाण्याचा निर्णय घेतला. जाताना तिने साऱ्या गावाला शाप दिला की या गावातील लोक कधीच दिवाळीचा सण साजरा करू शकणार नाहीत. त्यानंतर या गावात कोणी दिवाळी साजरी केलेली नाही. लोक केवळ सतीच्या मूर्तींची पूजा करतात!

## मानवाच्या स्थलांतराचा इतिहास बदलणार?



गिस्ट्रेलिया खंडात ६५ हजार वर्षांपूर्वी मानवाचे अस्तित्व असल्याचे पुरावे पुरातत्त्व शास्त्रज्ञांना मिळालेले आहेत. या शोधाने आधुनिक मानवाने आफ्रिकेतून स्थलांतराला सुरुवात केल्याच्या ज्ञात इतिहासाला बदलले आहे. ऑस्ट्रेलिया खंडाच्या उत्तरेकडील प्राचीन काकाडूतील जाबिलुका येथील खाणींच्या पट्ट्यामध्ये पुरातत्त्व उत्खननात ऑस्ट्रेलियातील आदिवासी जमातीचे वास्तव्य येथे किमान ६५ हजार वर्षांपासून असल्याचे पुरातत्त्व शास्त्रज्ञांना आढळून आले. त्याप्रमाणे येथे राहणारे मानवाचे पूर्वज हे अवजारे बनविण्यातदेखील कुशल असल्याचे आढळले. याआधी समजल्या जाणाऱ्या काळाच्या १८ हजार वर्षांपूर्वीपासून मानवाचे ऑस्टेलियात वास्तव्य होते, असे आढळून आले.

या शोधामुळे पुरातत्त्व क्षेत्रामध्ये कुतूहल निर्माण झाले. या संशोधनाची समीक्षा प्रसिद्ध पुरातत्त्व शास्त्रज्ञांनी केली असून, ती 'नेचर' या प्रतिष्ठित विज्ञान नियतकालिकात प्रसिद्ध करण्यात आली. ऑस्ट्रेलियात वास्तव्य करणारा मानव हा त्या काळातील अत्याधुनिक अवजारे बनवत असल्याचे संशोधनादरम्यान आढळलेल्या अवजारांवरून सिद्ध होते. अशा प्रकारच्या अवजारांची निर्मिती त्यानंतर २० हजार वर्षांनी झाल्याचे शास्त्रज्ञांनी सांगितले. संशोधनात आम्हाला चांगल्या प्रकारे जतन झालेल्या कुऱ्हाडी आढळल्या, असे पुरातत्त्व संशोधक व क्विन्सलँड विद्यापीठाचे प्राध्यापक ख्रिस क्लार्कसन यांनी सांगितले. या शोधामुळे आधुनिक मानव हा आफ्रिका खंडातूनच स्थलांतरित झाला होता, या संकल्पनेला तडा गेला आहे.

## स्टायरोफोमइतकी घनता असलेला बाह्यग्रह!



अंथ्वीपासून ३२० प्रकाशवर्षे अंतरावर असलेल्या ताऱ्याभोवती फिरणाऱ्या मोठ्या ग्रहाचा शोध वैज्ञानिकांनी लावला असून, त्याची घनता स्टायरोफोमइतकी आहे. हा ग्रह फुगलेला असून, त्याचा फायदा जीवसृष्टी असणाऱ्या ग्रहांचा अंदाज घेण्यासाठी करता येणार आहे, त्यासाठी तेथील वातावरणाच्या चाचण्या घ्याव्या लागतील. हा ग्रह फुगलेला असून, त्याचे वस्तुमान गुरूच्या एक पंचमांश आहे; पण तो ४० टक्के मोठा आहे. त्याचे वातावरण विस्तृत आहे, असे अमेरिकेतील लेहीग विद्यापीठाचे सहयोगी प्राध्यापक जोशुआ पेप्पर यांनी सांगितले.

स्टायरोफोम हे फुगवलेले पॉलिस्टायरिन असते व ते अन्नाचे कंटेनर तयार करण्यासाठी वापरले जाते. या ग्रहाचा मातृतारा चमकदार असून, त्यामुळे या ग्रहाच्या वातावरणाचे मापन सहज शक्य आहे. इतर ग्रहांच्या वातावरणाच्या मापनासाठी हा ग्रह म्हणजे एक सराव प्रयोगशाळा ठरणार आहे. या ग्रहाचे नाव केईएलटी ११ बी असे असून, तो ताऱ्याभोवतीच अगदी जवळच्या कक्षेतून फिरत आहे. या कक्षेत फिरण्यास त्याला पाच दिवस लागतात. केईएलटी ११ हा तारा अणुइंधन वापरत असून, त्याचे रूपांतर लाल मोठ्या ग्रहात होत आहे. त्यानंतर तो ग्रह ताऱ्याने वेढला जाईल व पुढील शेकडो दशलक्ष वर्षांत तो तग धरू शकणार नाही.

## ब्रिटिशही पूर्वी होते काळे



इंग्रजी राजवटीच्या काळात आपल्या देशात इंग्रजांना 'गोरा साहेब' असे म्हटले जात असे. या गोरेपणाची घमेंड अनेक पाश्चात्त्यांना आजही असते. कृष्णवर्णीयांना अशाच मनोवृत्तीच्या लोकांनी जी वागणूक दिली ती इतिहासात नमूद आहे. मात्र हेच 'गोरे' म्हणवून घेणारे लोक एकेकाळी काळेच होते हे तुम्हाला माहिती आहे का? हो, हे खरे आहे. इंग्रज हे मुळात काळे होते असे संशोधन झालेले असून, लंडनमध्येच झालेल्या एका अभ्यासातून ही बाब समोर आली आहे.

१० हजार वर्षांपूर्वीच्या सापळ्यातील डीएनएचा अभ्यास केल्यानंतर संशोधकांकडून ही बाब समोर आलेली आहे. त्यामुळे ब्रिटनमधील मूळ व्यक्ती हा वर्णाने काळा असल्याच्या गोष्टीवर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. याशिवाय या व्यक्तीच्या डोळ्यांचा रंग निळा असल्याचे समोर आले आहे. यासाठी सापळ्यातील डीएनएचा अभ्यासकांनी अभ्यास केल्यानंतर ही बाब लक्षात आली आहे.

या संशोधनासाठी ब्रिटन नॅचरल हिस्टरी म्युझियम आणि लंडनमधील युनिव्हर्सिटी कॉलेजच्या संशोधकांनी विशेष अभ्यास करत ही बाब समोर आणली. त्यांनी सापळ्यातील कवटीला २ मिलिमीटरचा छेद देऊन त्यातील हाडांचे नमुने तपासणीसाठी घेतले. या नमुन्यांचा अभ्यास केल्यानंतर १० हजार वर्षांपूर्वी 'ब्रिटिश' काळे असल्याची बाब समोर आली. ब्रिटिश कायम गोरेच असतात, असा आपल्या सगळ्यांचा समज असतो. मात्र, आताच्या संशोधनाने हा समज मोडीत निघाला आहे. त्यामुळे हे संशोधन ही अतिशय आश्चर्याची बाब असल्याचे या संशोधकांचेही म्हणणे आहे.

## मागणी राणी नेफरतितीच्या पुतळ्याची

इजिप्तच्या तीन-चार हजार वर्षांपूर्वीच्या संस्कृतीच्या खुणा आजही पिरॅमिड, मकबरे व प्राचीन कलाकृतींच्या स्वरूपात पाहायला मिळतात. त्यापैकीच एक कलाकृती म्हणजे ३,३७० वर्षांपूर्वीच्या राणी नेफरतितीचा पुतळा. या पुतळ्याचा शोध लागल्यापासून तो जर्मनीतच आहे. एका इजिप्शियन पुरातत्त्वज्ञाने बर्लिनमध्ये असलेला हा राणी नेफरतितीचा अर्धपुतळा परत करण्याची मागणी केली आहे; तर जर्मनीने तसे करण्यास नकार दिला आहे.

नेफरतिती प्राचीन इजिप्तच्या इतिहासातील एक अत्यंत प्रसिद्ध आणि प्रभावशाली राणी होती. ती फेरो (राजा) अखेनातेनची पत्नी होती. फेरो अखेनातेन हा इजिप्तच्या अठराव्या राजवंशातील एक महत्त्वाचा शासक होता. अखेनातेनच्या कारकिर्दीत इजिप्तमध्ये धार्मिक क्रांती झाली. अतेनच्या- सूर्यपूजनाला महत्त्व याच कालखंडात प्राप्त झाले तर नेफरतितीने या नवीन धार्मिक परंपरेमध्ये आपल्या पतीला पाठिंबा दिला. नेफरतितीची प्रतिमा इजिप्तमधील अनेक कलाकृतींमध्ये आढळते. तिचा प्रसिद्ध रंगीत चुनखडीचा अर्धपुतळा १९१२ साली जर्मन पुरातत्त्वज्ञांनी अमार्ना शहरातून शोधून काढला. आज तो प्रसिद्ध पुतळा बर्लिनच्या न्यूस म्युझियममध्ये आहे. नेफरतिती ही केवळ तिच्या सौंदर्यासाठी प्रसिद्ध नव्हती, तर ती एक बुद्धिमान आणि शक्तिशाली स्त्री होती. तिच्या अनेक शिल्पांवरून ती पतीच्या समकक्ष मानली जात असल्याचे संकेत मिळतात. तिचा प्रभाव तिच्या जीवनकाळात आणि त्यानंतरही इजिप्तच्या इतिहासात कायम राहिला आहे. तिचा अर्धपुतळा आजही जगभरातील अनेकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळेच जर्मनीकडून हा पुतळा परत मिळावा, अशी मागणी आता मूळ धरू लागली आहे.

नेफरतितीच्या अर्धपुतळ्याची किंमत अंदाजे ४३३ दशलक्ष डॉलर्स एवढी आहे. हा पुतळा इजिप्शियन पुरातन वस्तूंच्या मुकुटातील एक रत्न मानला जातो. परंतु, राणी नेफरतितीचा ३,३७० वर्षांपूर्वीचा अर्धपुतळा १९१३ पासून बर्लिनमध्ये आहे. आता तो परत देण्याबाबत दबाव वाढतो आहे. इजिप्तचे माजी पुरातत्त्व विभाग मंत्री झही हवास यांनी होस्नी मुबारक यांच्या २०११ मधील राजीनाम्याच्या निदर्शनांपूर्वी नेफरतितीचा पुतळा परत आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते. जर्मनीने राणी नेफरतितीचा प्रसिद्ध अर्धपुतळा परत करावा यासाठी हवास यांनी यावर्षीही सप्टेंबरमध्ये याचिकेच्या माध्यमातून प्रयत्न केले आहेत.





## पृथ्वीशी साधर्म्य असणारा बाह्यग्रह

एखाद्या ग्रहावर जीवसृष्टी विकसित होण्यासाठी काही गोष्टी अनुकूल असाव्या लागतात. त्यामध्ये योग्य तापमानासाठी ग्रहाचे त्याच्या ताऱ्यापासूनचे अंतर, कठीण-खडकाळ पृष्ठभाग आणि पाण्याचे अस्तित्व याचा यामध्ये समावेश होतो. आतापर्यंत खगोलशास्त्रज्ञांनी आपल्या सौरमालिकेबाहेरील हजारो ग्रहांचा शोध लावलेला आहे. यापैकी काही बाह्यग्रह पृथ्वीसारख्या कठीण पृष्ठभागाचे आहेत. त्यामध्ये पृथ्वीपासून १११ प्रकाशवर्ष अंतरावर असलेल्या 'के १८ बी' या ग्रहाचा समावेश होतो. कॅनडातील टोरांटो विद्यापीठाच्या संशोधकांनी युरोपियन सदर्न ऑब्झर्व्हेटरीच्या साहाय्याने या बाह्यग्रहाचा शोध लावला. तो 'के-१८' या लाल बटू ताऱ्याभोवती फिरत आहे. सिंह तारकापुंजात तो पृथ्वीपासून १११ प्रकाशवर्ष अंतरावर आहे. टोरांटो विद्यापीठाचे संशोधक रायन क्लॉटियर यांनी सांगितले की, के २-१८ बी हा ग्रह विलक्षण आहे आणि त्याचा शोध उत्कंठा वाढवणारा आहे. २०१५ मध्ये या ग्रहाचा शोध लागला होता व एका ताऱ्यापासून वसाहतयोग्य अंतरावर तो फिरत आहे, हे लक्षात आले होते. योग्य तापमान असल्याने तिथे पाणीही असण्याची शक्यता आहे. अद्याप काही घटकांच्या आधारे त्याची पृथ्वीसदृश ग्रह म्हणून तपासणी होणे बाकी आहे, असे 'ॲस्ट्रॉनॉमी अँड ॲस्ट्रोफिजिक्स' या नियतकालिकातील शोधनिबंधात म्हटले आहे. क्लॉटियर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी चिलीतील युरोपियन स्पेस ऑब्झर्वेटरीच्या साहाय्याने हे संशोधन केले.

## मानवी जनुकीय घड्यांच अनोखा नकाशा

माणसाचे अवघे व्यक्तिमत्त्व तसेच आरोग्य व अगदी आयुर्मानापर्यंतच्या सर्व गोष्टींची कुंडली त्याच्या जनुक व डीएनएमध्ये लपलेली असते. अशा मानवी जनुकीय घड्यांचा चार मितींचा नकाशा तयार करण्यात आला असून, त्यात भारतीय वंशाच्या वैज्ञानिकाचा समावेश आहे. स्टॅनफर्ड व हार्वर्ड विद्यापीठातील संशोधकांनी हे यश मिळवले आहे. त्यामुळे जनुकीय आजारांवर उपचारात मदत होणार आहे.

गेली काही दशके संशोधकांना असे वाटत होते की, मानवी पेशी या काही विशिष्ट पद्धतींनी एकमेकांशी संपर्कात असतात. ते एकमेकांच्या लगेच सान्निध्यात येतात व गुणसूत्राभोवती कडे करतात. डीएनएच्या घटकांची फेररचना करता येते. त्यातून पेशी कुठली जनुके क्रियाशील करायची हे ठरवत असतात. २०१४ मध्ये वैज्ञानिकांनी असे सांगितले होते की, ही वेटोळी शोधता येतात. यातील पहिले नकाशे हे स्थिर स्वरूपाचे होते व त्यात वेटोळ्यातील बदल टिपता आला नव्हता. पेशी केंद्रकाच्या गर्दीच्या जागेत डीएनए एकमेकांना कसे ओळखतात व पेशींचा प्रतिसाद कसा नियंत्रित होतो हे आता समजत आहे. यापूर्वी जे नकाशे होते त्यात घडी असलेल्या जिनोमचा विशिष्ट अवस्थेत वेध घेतला जात होता; पण स्थिर चित्रातून बदल कळत नव्हते. त्यामुळे प्रक्रिया नेमक्या कशा घडतात हे कळत नव्हते, असे स्टॅनफर्डचे विद्यार्थी सुहास राव यांनी सांगितले. जनुकांच्या घड्यांचा अभ्यास करून त्यांच्यातील घडणे व नष्ट होणे या दोन्ही क्रिया एखाद्या चित्रपटासारख्या पकडता येतात, असे राव यांनी सेल या नियतकालिकातील शोधनिबंधात म्हटले आहे. जनुकांच्या घड्यांची प्रक्रिया शोधण्यासाठी चकतीच्या आकाराच्या कोहेजिन या प्रथिनाचा वापर करण्यात आला. ते या वेटोळ्यांच्या सीमेवर होते. यापूर्वी या वैज्ञानिकांनी डीएनए वेटोळी कोहेसिनमुळे पेशीत तयार होतात व त्या प्रक्रियेला एक्सट्रूशन म्हणतात, असे स्पष्ट केले होते. पाठीवरच्या बॅगेच्या पट्टद्याची लांबी कमी-जास्त करता येते, तसा एक्सट्रूशन प्रक्रियेचा उपयोग असतो. त्यामुळे डीएनएची वेटोळी तयार होतात व कोहेसिन वेटोळी जे ठरवतील तेच काम ते डीएनए करतात. कोहेसिन नसेल तर वेटोळी नष्ट होतात, असे राव यांचे म्हणणे आहे. कोहेसिन डीएनएमध्ये ज्या वेगाने फिरते त्या वेगाने कुठलेही प्रथिन फिरत नाही.





'आयएमएस'मध्ये बीबीए व बीसीए फ्रेशर्ससाठी इंडक्शन कार्यक्रमामध्ये उपस्थित असलेले तज्ज्ञ मार्गदर्शक व विद्यार्थी.

# 'आयएमएस'मध्ये बीबीए व बीसीए फ्रेशर्ससाठी 'जेनेसिस इंडक्शन' कार्यक्रम

नगर – बी. पी. हिवाळे एज्युकेशन सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज्, करिअर डेव्हलपमेंट ॲण्ड रिसर्च येथे नव्याने प्रवेश घेतलेल्या BBA आणि BCA प्रथम वर्षांच्या विद्यार्थ्यांसाठी 'GENESIS – इंडक्शन प्रोग्राम २९ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर या कालावधीत उत्साहात झाला. या कार्यक्रमाचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना संस्थेच्या शैक्षणिक, प्रशासकीय आणि सामाजिक उपक्रमांची ओळख करून देणे, तसेच त्यांना करिअरच्या दृष्टीने योग्य दिशा देणे असे होते.

कार्यक्रमाची सुरुवात आयएमएसचे संचालक डॉ. एम. बी. मेहता यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील शिस्त, नियम आणि धोरणांची माहिती दिली. उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांनी विद्यार्थ्यांचे मनपूर्वक स्वागत करत त्यांना आयएमएसमध्ये मिळणाऱ्या संधीबाबत मार्गदर्शन केले.

BCA विभागाचे समन्वयक डॉ. सय्यद मुदस्सर यांनी BCA अभ्यासक्रम व परीक्षा पद्धतीबाबत सखोल माहिती दिली, तर BBA विभागाचे समन्वयक डॉ. हर्षवर्धन भावसार यांनी BBA अभ्यासक्रमाची रचना तसेच संस्थेतील विविध उपक्रमांची माहिती दिली.

प्रो. सुरेश खन्ना यांनी प्लेसमेंट आणि करिअर संधी यावर विद्यार्थ्यांना मौल्यवान मार्गदर्शन केले. कार्यालयीन अधीक्षक शरयू कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रक्रियेतील आवश्यक कागदपत्रे, शासकीय योजना आणि प्रशासकीय बाबतीत काय काळजी घ्यावी याची माहिती दिली.

सीए उमेश दोडेजा यांचे Potential to Performance या विषयावर व्याख्यान झाले. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये व्यवस्थापन कौशल्ये विकसित करण्यावर भर दिला.

दुसऱ्या दिवशी लाईफ कोच डॉ. मीरा कुलकर्णी यांचे Unlocking Your Potential या विषयावर प्रभावी सत्र झाले. विद्यार्थ्यांना स्वतःमधील कौशल्य ओळखण्यासाठी प्रेरणा मिळाली.

यानंतर ग्रंथपाल डॉ. स्वाती बार्नबस यांनी आयएमएसच्या डिजिटल व फिजिकल लायब्ररीबाबत सविस्तर माहिती दिली. ग्रंथालयाच्या विविध सुविधा, ई–रिसोर्सेस आणि अभ्यासासाठी उपलब्ध साहित्य यांची ओळख करून दिली.

इंडक्शन कार्यक्रमाच्या तिसऱ्या दिवशी विद्यार्थ्यांसाठी रेडिओ जॉकी प्रसन्न यांच्या उपस्थितीत स्वागत पार्टीचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी BBA विभागातील प्रो. शितल नाबरिया, प्रो. सायली तोरणे, प्रो. श्रद्धा भंडारी आणि BCA विभागातील प्रो. स्वाती ठोंबरे, प्रो. अश्विनी बारा व प्रो. अजित कुटे यांनी परिश्रम केले.

"GENESIS' इंडक्शन प्रोग्राम विद्यार्थ्यांसाठी केवळ माहितीपर नव्हता, तर त्यांचा आत्मविश्वास वाढवणारा आणि संस्थेशी जोडणारा अनुभव ठरला.

# अन्नपदार्थांमधील भेसळ रोखण्यासाठी प्रशासनाची 'विशेष तपासणी मोहीम'

मुंबई – सणासुदीच्या काळात अन्नपदार्थां–मधील संभाव्य भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने विशेष तपासणी मोहीम हाती घेतली आहे. 'सण महाराष्ट्राचा–संकल्प अन्न सुरक्षेचा' या राज्यव्यापी मोहिमेअंतर्गत आतापर्यंत १ हजार ५९४ अन्न पेढ्यांची तपासणी करण्यात आली असून २ हजार ३६९ अन्न नमुने तपासणीसाठी घेण्यात आले आहेत, अशी माहिती अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मंत्री झिरवाळ म्हणाले, या तपासणी मोहिमेत दूध, खवा, तूप, खाद्यतेल, मिठाई, सुकामेवा आणि चॉकलेटसारख्या अन्नपदार्थांचे नमुने घेण्यात आले आहेत. आतापर्यंत ५५४ नमुन्यांचे अहवाल प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ५१३ नमुने प्रमाणित, २६ कमी दर्जाचे ४ लेबल दोष असलेले आणि ११ नमुने असुरक्षित असल्याचे आढळले आहेत. उर्वरित १ हजार ८१५ नमुन्यांचे अहवाल प्रलंबित आहेत.

अन्न व औषध प्रशासन विभागाने २०२२ पासून प्रलंबित असलेल्या २०० हून अधिक सहायक आयुक्त (अन्न) आणि अन्न सुरक्षा अधिकारी पदांची भरती प्रक्रिया पूर्ण केली आहे. या बरोबरच अन्न व औषध प्रशासनाला अधिक बळकटी देण्यासाठी नवीन ७५० पदांच्या निर्मितीचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करण्यात येत असल्याचे मंत्री झिरवाळ यांनी सांगितले.

अन्न नमुन्यांचे वेळेत विश्लेषण करण्यासाठी राज्यात प्रयोगशाळांचे बळकटीकरण केले जात आहे. नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे येथील नवीन प्रयोगशाळांचे बांधकाम पूर्ण झाले असून या प्रयोगशाळांचे उद्घाटन लवकरच करण्यात येणार आहे. या प्रयोगशाळा प्रभावीपणे चालवण्यासाठी २५० नवीन पदांचा प्रस्ताव वित्त विभागाला सादर करण्यात येत आहे. प्रयोगशाळांच्या बळकटीकरणासाठी उपमुख्यमंत्री तथा वितमंत्री अजित पवार यांनी २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

मंत्री झिरवाळ म्हणाले, हाफकिन इन्स्टिट्यूट फॉर ट्रेनिंग रिसर्च ॲण्ड टेस्टिंग या संस्थेमध्ये पोलिओ लस निर्मितीसाठी २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, तर सर्पदंशावरील लस निर्मितीसाठी १ कोटी ५० लाखाचा निधी अर्थसंकल्पीत केला आहे. यामध्ये आवश्यकतेनुसार वाढ केली जाईल. तसेच डॉ. माशेलकर समितीच्या शिफारशीनुसार एक त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. यात वैद्यकीय शिक्षण, वित्त नियोजन आणि सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिवांचा समावेश असल्याचेही ते म्हणाले.

दुधातील भेसळ रोखण्यासाठी तपासणी मोहीम अधिक व्यापक केली जाणार असल्याचे सांगून मंत्री झिरवाळ म्हणाले, जीएसटी कमी झाल्याने औषधांच्या किंमत कमी झाल्या आहेत. जे औषध विक्रेते कमी झालेल्या किंमतीनुसार औषधाची विक्री करणार नाही त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असेही ते पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले.

# जिल्हा सहकारी बँकेने कर्जमाफीचा ठराव करावा



ॲड. सुरेश लगड

नगर – नुकतीच अहिल्यानगर मध्यवर्ती सहकारी बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. त्या सभेत सभासद शेतकऱ्यांचा कर्जमाफीचा ठराव न घेता सभा पार पाडली.

सभेत त्या संदर्भात कर्जमाफी बद्दल जरी फारसे कुणी बोलले नसले तरी सर्व आलबेल आहे, असे समजण्याचे कारण नाही. अलीकडे वार्षिक सभेत भाग घेऊन बोलण्याची मानसिकताच राहिलेली नाही. सत्ताधारी संचालकांनी स्वतः हून कर्जमाफीचा ठराव मंजूर करून शासनाकडे पाठवायला पाहिजे होता. आता तर अतिवृष्टीमुळे सभासद, शेतकरी अतिशय मेटाकुटीला आलेला आहे. अशा परिस्थितीत सर्व शेतकरी, सभासदांना सरसकट कर्जमाफी द्यावी. तसेच जे सभासद पुर्वी कर्जमाफीपासून वंचित राहिले, त्यांनाही या सरसकट कर्जमाफीचा लाभ द्यावा, असा ठराव अजूनही जिल्हा बँकेस विशेष सर्वसाधारण सभा बोलवून करता येईल. सुदैवाने या सहकारी बँकेत जवळपास सर्वच संचालक, अधिकारी हे शेतकरी कुटुंबातील असतानाही शेतकरी सभासदांचा कर्जमाफीचा ठराव मंजूर करु शकले नाही, ही फार मोठी शोकांतिका आहे. शेतकऱ्यांच्या जीवावर राजकारण करणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी थोडा तरी याचा विचार करायला पाहिजे होता, असे ॲड. सुरेश लगड यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्रात प्रथमच अहिल्यानगरला ७ महिन्याच्या बाळाच्या किडनीमधील दहा एम.एम. मुतखड्याची अत्याधुनिक टेक्निकद्वारे यशस्वी शस्त्रक्रिया



डाव्या किडनीमध्ये मुतखड्याची यशस्वी शस्त्रक्रियेनंतर बाळास पालकांकडे सोपविताना साताळकर लोटस सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे डॉ. डॉ.हर्षवर्धन तन्वर व सहकारी डॉक्टर्स आदी.

नगर – महाराष्ट्रात पहिल्यांदाच ७ महिन्यांच्या बाळावरती ज्याचे वजन ७ किलो असून त्या बाळाच्या डाव्या किडनीमध्ये 10mm मुतखड्याची (Paediatric flexible Uretric Scope (40cm) RIRS या अत्याधुनिक Technic द्वारे यशस्वी शस्त्रक्रिया डॉ. हर्षवर्धन तनवर व डॉ. सुदर्शन डागा M.C.H. Urologist यांनी ही आव्हानात्मक सर्जरी यशस्वीरित्या साताळकर लोटस सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे केली. तसेच सांगण्यास आनंद होत आहे की, (Paediatric flexible Uretric Scope) ४० से.मी. लांबीचा स्कोप वापरण्यात आला. लहान मुलांमध्ये मुतखडा ही शस्त्रक्रिया अत्यंत अवघड व गुंतागुंतीची असून बहुतेकदा शरिरावर चिरफाड देखील करण्यात येते. परंतू या अत्याधुनिक (RIRS) लेझर तंत्रज्ञानाने कुठेही चिरफाड न करता लघवी मार्गातुन किडनीपर्यंत जाऊन सर्जरी यशस्वीरित्या केली व बाळास दुसऱ्या दिवशी डिसचार्ज देखील करण्यात आले. या शस्त्रक्रियेसाठी भुलतज्ञ डॉ.सचिन लांडगे व ललित जोशी यांनी भूल देऊन बाळास कुठलाही त्रास न होता यशस्वीरित्या शस्त्रक्रिया केली.

त्यांच्या या यशाचे सर्वांकडुन अभिनंदन होत आहे. डॉ.हर्षवर्धन तन्वर हे गेली १२ वर्षे पुर्णवेळ नगरमध्ये रुग्णांना युरोलॉजीच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया साताळकर लोटस सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, सर्जेपुरा, अहिल्यानगर येथे देत असून अनेक रुग्णांना त्याचा फायदा होत आहे.



नगर तालुक्यातील पांगरमल येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी करून पंचनामे सुरू केले. यावेळी माजी सरपंच भीमराज आव्हाड, तलाठी राजेंद्र सांगळे, ग्रामसेविका अर्चना आडसुरे, मंडल अधिकारी राम नलवडे, कृषी सहाय्यक डुकरे, ग्रामस्थ आदी (छाया– विजय मते)

# पांगरमल गावातील नुकसानीचे पंचनामे सुरू

## भीमराज आव्हाड यांचे उपोषण स्थगित

नगर – पावसाने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून संपूर्ण शेती पाण्यात गेली. महाराष्ट्रात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूलमंत्री, जिल्हाधिकारी, तहसीलदार, लोकप्रतिनिधी आदींनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली, पंचनामे करण्याचे आदेश दिले. तरीही नगर तालुक्यातील पांगरमल गावात अद्याप पंचनामे झाले नसल्याने शेतकरी मदतीपासून वंचित आहेत. ग्रामसेवक गैरहजर राहतात या तक्रारीवरून पांगरमलचे माजी सरपंच भीमराव आव्हाड यांनी ग्रामपंचायतीला कुलूप ठोकले व शेतकऱ्यांसह ग्रामपंचायत समोर उपोषणास बसले. यावेळी पांडुरंग आव्हाड, महादेव आव्हाड, नारायण आव्हाड, नवनाथ आव्हाड, अंबादास आव्हाड, नामदेव आव्हाड, बाबुराव वाकडे, मिठू आव्हाड, रेवनाथ आव्हाड, अंजाबापू आव्हाड, हरिभाऊ आव्हाड, अक्षय आव्हाड, अजित आव्हाड, संतोष आव्हाड, प्रकाश आव्हाड, सुनील आव्हाड, तुकाराम आव्हाड, सतीश आव्हाड आदी उपस्थित होते. ग्रामवसूल अधिकारी राजेंद्र सांगळे यांनी तातडीने दखल घेत, श्री.आव्हाड यांना आश्वासन दिल्या प्रमाणे पांगरमलमधील पंचनामे तातडीने करून एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, असे सांगितले ग्रामसेविका या तातडीने पंचनामे सुरु करतील, असे सांगितल्यावर श्री. आव्हाड यांनी उपोषणास स्थगिती दिली.

शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन ग्रामसेविका अर्चना आडसुरे, जेऊर मंडल अधिकारी राम नलवडे, कृषी सहाय्यक डुकरे आदींनी ग्रामस्थांसह पंचनामे करण्यास सुरुवात केली.

# पंचनामे करण्यासाठी विशेष पथके स्थापन

## नेप्ती मंडळातील १० गावातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांच्या पंचनाम्याना वेग



नेप्ती मंडळातील १० गावातील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांच्या पंचनाम्यांना सुरुवात झाली आहे.

नगर – नगर तालुक्यातील नेप्ती महसूल मंडळातील नेप्ती, निमगाव वाघा, हिंगणगाव, जखणगाव, हिवरे बाजार, टाकळी खादगाव आदी १० गावांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. पावसाने उघडीप दिल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांच्या पिकांच्या पंचनाम्याना वेग आला आहे. शेत पीक व फळबागांचे या भागात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. बाधित शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी विशेष पथके स्थापन करण्यात आली आहेत अशी माहिती नेप्ती मंडळ अधिकारी प्रताप कळसे यांनी दिली.

सध्या पंचनाम्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. हे काम उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अहिल्यानगर तहसीलदार यांच्या आदेशानुसार राबविले जात आहे. प्रत्येक गावात ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी आणि सहाय्यक कृषी अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असून पर्यवेक्षण अधिकारी म्हणून नेप्ती मंडळ अधिकारी प्रताप कळसे यांची नेमणूक करण्यात आली आहे. या आदेशानुसार नेप्ती मंडळातील नेप्तीच्या ग्राम महसूल अधिकारी सुवर्णा रांधवण, निमगाव वाघाचे ग्राम महसूल अधिकारी विनायक दिक्षे, हिंगणगावचे ग्राम महसूल अधिकारी दिपक झेंडे, जखणगावच्या ग्राम महसूल अधिकारी दिपाली विधाते, हिवरे बाजारचे ग्राम महसूल अधिकारी श्रीकृष्ण निमसे, टाकळी खातगावच्या ग्राम महसूल अधिकारी रूपाली म्हस्के यांनी समितीतील इतर नियुक्त सदस्यांसह आपल्या गावात पंचनामे करण्यास सुरुवात केली आहे.

या गठीत समितीने नेप्ती गावात पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकरी भानुदास विठोबा फुले यांच्या कांदा पिकाची पाहणी केली. यावेळी मंडळ अधिकारी प्रताप कळसे, कृषी अधिकारी रावसाहेब नवले, ग्राम महसूल अधिकारी सुवर्णा रांधवण, माजी सरपंच संजय जपकर, रामदास फुले, हरणाबाई फुले, प्रकाश बेल्हेकर, अरुण बेल्हेकर, राजू साळुंके, सिताराम बेल्हेकर, नामदेव बेल्हेकर, अर्णव बेल्हेकर, यश बेल्हेकर, सुरज साळुंके, जालिंदर बेल्हेकर व ग्रामस्थ उपस्थित होते.

सध्या मंडळातील सुमारे ३ हजार शेतकऱ्यांपैकी २३१९ शेतकऱ्यांचे पंचनामे पूर्ण करण्यात आले आहेत. यात सुमारे १७१४ हेक्टर क्षेत्र बाधित असल्याचे नोंदवले गेले आहे. याशिवाय ४ घरांची आणि ४ विहिरींची पडझड झाल्याचे पंचनाम्यात नमूद करण्यात आले असून त्यांचे पंचनामेही पूर्ण झाले आहेत. नेप्ती महसूल मंडळातील ६८१ शेतकऱ्यांच्या सुमारे ५०१ हेक्टर क्षेत्राचे पंचनामे अद्याप बाकी असून हे काम पुढील दोन दिवसांत पूर्ण केले जाणार आहेत असे मंडळ अधिकारी प्रताप कळसे यांनी सांगितले.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली स्थावर मिळकत ही मूळ लक्ष्मण हनुमंता भालेराव यांची स्वकष्टार्जीत मालकी वहिवाटीची मिळकत होती. सदर मिळकत त्यांनी १९५३ साली खरेदी केलेली आहे त्यांनी दिनांक २६/१०/१९७५ रोजी अर्ज देऊन खाली नमुद केलेली मिळकत ही आमचे अशिलाचे वडिल पोपट लक्ष्मण भालेराव यांचे नावावर केलेली आहे. त्याप्रमाणे मिळकतीचे उताऱ्याला फेरफार नं.१२१२ पडलेला आहे. सदर मिळकत ही नवीन शर्तीची मिळकत आहे. सदर मिळकत ही वडिलोपार्जीत असताना व आमचे अशिलाचा सदर मिळकतीमध्ये वारसा हक्काने हिस्सा असतानाही तो डावलण्याचे गैर उद्देशाने पोपट लक्ष्मण भालेराव, पद्मा सचिन सातपुते व योगेश पोपट भालेराव हे एकमिलाफी होऊन सदर मिळकत विकण्याचे तयारीत असल्यामुळे त्यांनी सदर मिळकत ही नवीन शर्तीची असल्याने ती विकण्याची परवानगी मिळण्यासाठी मे. जिल्हाधिकारी साहेबांकडे अर्ज दिल्याचेही खात्रीशिर माहिती मिळाली आहे व व्यवहार करण्याबाबत बोलणी चालू असल्याबाबत खात्रीशीर माहिती मिळाल्यामुळे खाली नमूद मिळकतीचे कोणीही कुठल्याही प्रकारचे व्यवहार केल्यास किंवा सदर मिळकतीबाबत कुठल्याही प्रकारचे हितसंबंध निर्माण केल्यास ते आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमुद केलेल्या मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा खरेदी–विक्रीचा व्यवहार करु नये केल्यास तो कायदेशीर होणार नाही. कोणीही मिळकतीबाबत व्यवहार करु नये म्हणून सदर नोटीस ही प्रसिध्द केली आहे.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन :**– डि.अहमदनगर सब डि. व ता. नगर पैकी मौजे सारोळाबध्दी येथील शेतजमिन मिळकत खालील प्रमाणे :

| गट नं. | क्षेत्र हे.आर | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
|---|---|---|---|---|---|
| ३२७ (जुना १४९) | ८.८३<br>१.९१<br>१०.७४ | डोंगर | अशोक लांडगे याची मिळकत | नदी | राजू बोरुडे यांची मिळकत |
| या संपूर्ण मिळकतीबाबत.. | | | | | |

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक मिळकत सर्व वागणुकीच्या वहिवाटीच्या हक्क व अधिकारासह दरोबस्त तदंगभूत वस्तुसहीत काही एक राखून न ठेवता.

**ॲड. राहुल विजय अत्रे**
२११, कोर्टयार्ड बिल्डींग, तारकपूर बस स्टॅण्ड समोर, तारकपूर, अहमदनगर
मो.नं.९८५०२४४४४८

ता. २६/०९/२०२५
अहमदनगर

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेला प्लॉट मिळकत विद्यमान मालक **१) निर्मला सुनिल झिर्पे, रा.पर्वते कॉलनी, गायकेमळा,स्टेशन रोड, अहिल्यानगर, २) आयकॉन डेव्हलपर्सचे भागीदार अ) श्रेणिक सुनिल गुगळे, ब) रिमलबाई चेनसुखलाल गुगळे, रा.भवानीनगर, अहिल्यानगर** यांचे मालकी वहिवाटीचा असून यांनी सदर प्लॉटस मिळकतीचे विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखूष खरेदी देण्यांचे ठरविले असून सदरची मिळकतीचे खरेदी–विक्रीचे करारनामा आमचे अशिलाबरोबर केलेला आहे व व्यवहारापोटी विसार म्हणून रक्कम सुध्दा घेतलेली आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की सदर मिळकतीबाबत कोणतेही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षिसपत्र मनाईहुकूम दावा कोर्ट कारवाई बॅक बोजा सोसायटी राईटस अन्य वस्त्र लिज अथवा अगर कोणताही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास संबंधीताने ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर प्लॉट खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन** – जिल्हा तुकडी अहिल्यानगर पो.तु.ता.नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील मौजे **नालेगांव** येथील बिगरशेती प्लॉटस्चे वर्णन खालील प्रमाणेचे प्लॉटस.

**स.नं.५३/१ ते ४ मधील प्लॉट नं.१५८ याचे क्षेत्र १८७.०० चौ. मीटर यांसी चतुःसिमा–**

पुर्वेस– प्लॉट नं.२०१, दक्षिणेस–प्लॉट नं. १५७,
पश्चिमेस–९ मीटर रस्ता, उत्तरेस–प्लॉट नं. १५९,

सदरचा प्लॉट हा निर्मला सुनिल झिर्पे रा.पर्वते कॉलनी, गायकेमळा, स्टेशन रोड, अहिल्यानगर.

**स.नं.५३/१ ते ४ मधील प्लॉट नं. १६३ याचे क्षेत्र १८७.०० चौ.मीटर, यांसी चतुःसिमा–**

पुर्वेस– प्लॉट नं.१९६, दक्षिणेस–प्लॉट नं. १६२,
पश्चिमेस–९ मीटर रस्ता, उत्तरेस–प्लॉट नं. १६४,

सदरचा प्लॉट हा निर्मला सुनिल झिर्पे रा.भवानीनगर, अहिल्यानगर.

दि.०३/१०/२०२५.
अहिल्यानगर

**ॲड. आर.टी.शर्मा, ॲड.गणेश एम.शर्मा**
मो.नं.९४२२२२०८४५, ऑफीस नं. १३, १४,१७,
पहिला मजला, श्री आनंद कॉम्प्लेक्स,दाळमंडई, अहिल्यानगर

Ahilyanagar's 1st Dolby 7.1 & Dolby Atmos Theater
SHOW TIMINGS - 02 OCT TO 09 OCT
कांतारा दि लेजंड: 07:00 am, 09:15 am, 10:00 am, 11:50 am, 02:45 pm, 05:00 pm, 08:15 pm, 08:35 pm, 10:40 pm, 11:35 pm
सन्नी संस्कारी की तुलसी कुमारी: 09:39 am, 12:15 pm, 02:40 pm, 05:45 pm, 08:10 pm, 11:15 pm
दशावतार 05:55 pm
जॉली LLB 3 03:00 pm
वडापाव 12:55 pm
टीप : शो च्या वेळा बदलू शकतात
Box Office | bookmyshow
नगर कॉलेज जवळ, झुडीयोच्या वस्ती, अ. नगर
9881300400, 0241-2346000
Cinélife MINIPLEX

दिनांक – ०२ ऑक्टोबर ते ०९ ऑक्टोबर २०२५
टिप : मुव्ही–शो च्या वेळा बदलु शकतात
Dashavatar 11:15 AM
Jolly LLB 3 07:30 PM
Vada Paav 05:30 PM
Sunny Sanskari Ki tu 08:00 AM I 10:30 AM, 01:15 PM I 04:00 PM, 06:40 PM I 10:30 PM
Kantara : A Legen 08:00 AM I 09:45 AM, 12:50 PM I 02:15 PM, 04:00 PM I 07:15 PM, 09:30 PM I 10:30 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar First & Most Luxurious Cinematic Paradise !
CONNPLEX
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

